# वऱ्हाडसमाचार.

## छापखाना.

( नोटीस वार्ते )

आकोला--तारीख ८ माहे एप्रील सन १९१८ ई०


### नोटीस

नोटीस बेशमी भगाजी वा नंदाजी अडनांव शिंदे जात कुणबी राहणार वाकूडी प्र. ता. पुसद जि यवतमाळ यांस खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून खुशालीनें तुमचे घरी नांदत असतां एके दिवशीं उपस्थीत झगडा करून व मजला मारहाण करून माझे अंगावरील डागदागीनें जबरदस्तीनें हिसकून मजला घराबाहेर काढून दिलें त्या गोष्टीस अंदाज तीन वर्षे होत आलीं मध्यंतरीं कांहीं दिवसानीं तुम्ही मला नेण्यास न येतां मी आपण होऊन नांदण्यास आले तरी तुम्ही मला घरीं सुद्धां येऊ दिलें नाहीं. तशीच मी परत माहेरी आली व कांहीं दिवसानीं फार बीमार झाले. त्या बीमारीस औषध पाण्यास व अन्नवस्त्रा करितां सरासरी २९० रुपये सावकाराचे कर्ज झालें आहे. हें सात्र अतिशय कठीण असल्यामुळें मजला कोणी आतां कर्ज न देता पहिल्याच रुपयाचा माझें मागे तगादा आहे त्यामुळें मजला अन्नवस्त्रा ची फार अडचण होऊन नाइलाज झाला आहे. या पूर्वी ही आपणास पोस्ट मार्फत कळविलें होते तरी त्याकडे आपण लक्ष दिलें नाहीं तरी आतां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत वरील रुपये व योग्य जमानतदार घेऊन येऊन मजला घेऊन जावे. मी नांदण्यास तयार आहे. वर लिहीलेले मुदतींत तुमचे कडून न होईल तर हीच नोटीस फारकत समजून मी दुसरा गंधर्वाचा नवरा करीन. मग तुमचा नवरेपणचा हक्क माझेवर मुळीच न राहून लग्नाचा फिर्यादीचा वगैरे कोणत्याच प्रकारचा खर्च सुद्धां मिळू शकणार नाहीं कळावें ता. द. मुकूंदा पुंजाजी

सही.

सहीची निशानी बांगडी सावित्री मर्द भगाजी हिची खु. असे

नो. नं. १३२

---

### नोटीस

नोटीस बेशमी मंजाई मर्द गणु काळोंनें जात कुणबी राहणार करोंड ता० चिखली जी० बुलडाणा व मुक्ताई मर्द गणू काळेने जात कुणबी राहणार घोडेगांव ता० आकोट यांसः—

नोटीस देतो कीं तुम्ही साक्षात माझ्या गंधर्वाच्या बायका आहांत. माझे सध्या झालेले वृद्धपकाळीं तुम्ही माझी आबाळ करणार नाहीं, माझे खाणेपिण्याचा शेतीची वगैरे सर्व तऱ्हेची व्यवस्था माझे मनाप्रमाणें ठवाल असा भरंवसा नाणून तुमचे दोघींचे नांवांनें मी ता० १९-२-१४ रोजीं लिहिलेलें व नोंदलेलें मृत्युपत्र करवून तुम्हास मौजे घोडगांव ता० आकोट येथील शेत

| सर्वे नं. | पो. नं. | एकर | गुंठे |
|---|---|---|---|
| ७७ | १ | १० | ३४ |

आकार रुपये २६ हे माझे मरणानंतर तुम्ही जिवंत आहां तों पावेतों अन्नवस्त्रासाठीं दिले होते. परतु तुम्ही माझे घरीं राहात नहीं. माझी सर्व प्रकारची अनास्था करीत आहां. माझे जवणखाण्याची देखील फिकीर करीत नाहीं. तरी तुम्हास नोटीस देतों कीं ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत तुम्ही मजजवळ तुमचे अंगावर माझे मालकीचे दागीने आहेत त्यसुद्धां माझे घरीं येऊन राहिल्यास व माझे इच्छेप्रमाणें माझी व्यवस्था ठेवल्यास मी तुमचे नांवें करून दिललें मृत्युपत्र कायम ठेवीन. नाहींतर तेंच मृत्युपत्र मी रद्द ठरवून मला वाटल त्या इसमास तें शेत मी देईन कळावे ता० २६-३-१९१८ सही.

निशानी गणू वा॥ अवधूत काळोने राहणार घोडेगाव ता० आकोट

नो. नं. १३३

---

### नोटीस.

नोटीस बेशमी तीर्थस्वरूप गं. भा. भिवराबाई मर्द दत्तू वडदकार राहणार कडूस ता. बळापूर यांसः—

या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं आमचे वडील दत्तू वा॥ तुकाराम हे ता. १३-२-१८ रोजीं मरण पावले. तुमच्या मालकी संबंधानें व जिनगीचा उपभोग घेण्यासंबंधानें आमची काडीमात्र तक्रार नाहीं, पण कांहीं लबाड लोक तुम्हाला फसवून शेवटीं आमच्या जिनगीची नासाडी करू इच्छितात. हल्लीं तुम्हाजवळ डागडागीना गुरेंढोरें व इतर भांडींकुडीं मिळून ४।५ शे रुपये किंमतीचा विषय आहे आणि आमच्या वडिलांच्या सर्व शेतीचें उत्पन्न सालीना ५०० शे रुपये येण्यासारखें आहे. किंबहुना ५०० रुपये स्वामित्वाच्या करारावर आम्ही ती शेती करण्यास तयार आहों. शंभर सवाशेपेक्षां आमच्या वडिलानां कोणाचें कर्ज नव्हतें तुम्हाला कर्ज वगैरे काढण्याचें प्रयोजन नहीं किंवा जंगम जिनगी विकण्याचेंही कारण नाहीं. आमचे वडील दत्तू वडदकार यांनीं मरते वेळीं मुलं आहेत तेव्हां दत्तक वगैरे घेऊं नये अशी तुम्हास आज्ञा केलेली आहे तिची आठवण तुम्हास सदोदित राहू द्यावी. इतक्याउपर लबाड लोकांच्या चिथावणीवरून दत्तक वगैरे घेण्याचे कराल तर तो रद्द आहे. तुम्ही स्थावर शेतीवाडी व घरदार कोणास गहाण खरेदी वगैरे देऊं नये. असे करण्याचा तुम्हाला अधिकार नहीं. याउपर जो कोणी तुमच्याशीं इस्टेटी संबंधानें देववेव करील तो तुम्हाला स्वतःला जबाबदार धरील, पण इस्टेट कोणत्याही प्रकारें जबाबदार राहणार नाहीं. आम्हाला बुडविण्याच्या इरादानें जर कोणाच्या सल्यानें तुम्ही शेती ११२ वर्षांपेक्षां अधीक सालच्या मुदतीनें दुसऱ्यास लावून काढाल तर ती लावणी व तो पट्टा रद्द होईल. या नोटिशीचा खर्च तुम्हावर पडेल. तुमच्या गैरगोष्टीमुळें ही नोटीस देणें भाग झालें कळावे ही विनंती तारीख ७-४-१८

सह्या

१ सखूबाई मर्द ओंकार शेळोळ रा. गोळखेड ता. खामगांव निशाणी हातची बांगडी.

२ चंद्रभागा मर्द अवधूत भरणे अ. पा. क. वडील बहीण सखूबाई इच्या हातची नि॥

नो. नं. १३४

---

### नोटीस.

रा. रा. सिवराम वल्लद झिंगराजी उपाध्ये राहणार काजळेश्वर ता० मुर्तिजापूर पोष्ट खेर्डा किंवा कारंजा यांसः—

खालीं सही करणार यांजकडून या नोटीशिनें जाहीर करण्यांत येते कीं तुम्ही बहीऱ्या वा॥ निंबा व श्रावण वा॥ निंबा भोई राहणार मौजे काजळेश्वर ता० मुर्तिजापूर या उभयतावर आकोला येथील मु. नं. २ याचकडे दि. मु. नं. २१९२ सन १९१३ चा हुकूमनामा मिळवून त्यांत प्रतिवादींचा स्थावर माल घर तारिख ८-९-१९१७ रोजीं जप्त करून हरास केलें ते हरासांत मी रकम रुपये ६९ ला घेतले व सर्टिफिकेट घेऊन ताबा घेतला. त्या घरावर सदु माधवर रा. काजळेश्वर यानें मालकीचा दावा करून त्यांत मजला प्रतिवादी नं. २ करून ता. २६-२-१८ रोजीं दि. मु. नं. १६४ सन १९१७ चा हुकूमनामा मिळविला व तो आतां त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करून घराचा ताबा घेण्याचे विचारांत आहे म्हणून तुम्हास कळवितों कीं त्यानें घराचा ताबा मजपासून घेतला तर मजला तुम्ही माझे खरेदीची रकम रुपये ६९ व कोर्टखर्च १० रुपये आणि या नोटिशीचा खर्च असें व रकमेचे व्याज दरमहा दरशेकडा २ रुपये प्रमाणें देऊन माझी पावती घ्यावी या प्रमाणें न केल्यास तुमचेवर फिर्याद करून मागील सर्व रकम व पुढील खर्च होईल तो भरून घेईन ही नोटीस दिली सही ता. २२-३-१९१८ मुकाम अकोला.

सही ( उर्दूत )

मुनीरखां वा॥ मनसबखां द. खु. रा. काजळेश्वर पोष्ट खेर्डा अगर कारंजा.

नो नं. १३५

---


आकोला वऱ्हाडसमाचार छा. छा.

'व-हाडसमाचार' छापखाना आकोला ता० १५-४-१८

## नोटीस

बेशमी जानाबाई मर्द रूपचंद श्रावगी राहणार खामगांव यांसः—

खाली सही करणार यांजकडून कळविण्यात येते कीं खुशालचंद कन्हयालाल हा माझा मावस भाऊ होता. त्याच्या रक्तपितीच्या उपचारासाठीं म्हणून मी आपल्या आईसुद्धा त्याच्या बरोबर कलकत्यास गेलो होतो. परत खामगांवीं आल्यानंतर मी थोडे दिवसासाठीं शेतीचें पीक जमा करण्यासाठीं मेहसांगवी येथें आलों पण खामगावला परत लवकर येण्याचा विचार असल्यामुळें मी खुशालच्या भंडारींत त्याला कळवून माझ्या मालकीच्या खालील जिन्नसा ठेविल्या होत्या.

| | वजन. |
|---|---|
| सोन्याचें कडे १ | ८॥ तोळे व कांहीं गुंजा. |
| सोन्याची कंठी १ | ७॥ तोळे यांत ५ रती कमी |
| रुप्याचे पेले २ | तोळे १६ |

तुम्ही आता खुशालचंदच्या भंडारीचा ताबा केला आहे तेव्हा मेहेरबानीनें कृपा करून माझ्या जिन्नसा मला परत द्याव्या. आठ दिवसाच्या मुदतींत तसें न केल्यास तुम्हावर दिवाणी व फौजदारी करून नुकसानी सुद्धा वरील वस्तु परत घेतल्या जातील.

खुशालचंदनें मला व माझ्या आईला तोंडी मृत्युपत्रानें २ दोन शेतें जगने निशाणी दवंडी व मळा ही दिली आहेत. त्याचा मी ताबा योग्य प्रकारें करीन. तुमचा त्याच्या जिनगीवर कांहींच हकसंबंध नाहीं. कळावें ता. १०-४-१८

सही

हजारीमल रूपचंद श्रावगी
राहणार मेहसांगवी
पेटा एदलाबाद.

नो. नं. १३१

## नोटीस

नोटीस बेशमी रामभाऊ वा। भगवान शिंपी राहणार बावनबीर ता० जळगांव पोष्ट बावनबीर यांसः—

शेवंती मर्द बळीराम शिंपी राहणार मौजे सोगोड ता० जळगांव पोष्ट सोनाळे इजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तूं माझ लबाडीनें फसवून मजपासून कुलमुखत्यारपत्र घेतलेंस. मला मुखत्याराची गरज मुळींच नाहीं. तरी सदरहू मुखत्यारपत्र लिहिलेल्या तारखेपासूनच मी रद्द केलें आहे. तरी मुखत्यारपत्राचें तारखेपासून माझे. तर्फे जो कांहीं व्यवहार केला असेल तो मला कबूल नाहीं व पुढेंही करूं नये. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत तुजजवळ असलेले कागदपत्र व मुखत्यारपत्र घेऊन यावे व माझी भेट घेऊन जावे कळावें तारीख १०-३-१९१८

सही

शेवंती मर्द बळीराम शिंपी
इचे हातची नि० आंगठा

नो. नं. १३६

आकोला वऱ्हाडसमाचार छा. खा.

# वऱ्हाडसमाचार.

## छापखाना.

( नोटीस खातें )

आकोला--तारीख २२ माहे एप्रील सन १९१८ ई०


### नोटीस.

नोटीस बेशमी शेखअबदुल्ला महमदबारस मुसलमान राहणार अडगांव बु॥ ता. अकोट जि० आकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, आज सात वर्षे झालीं माझी मुलगी मगलुमबी हिचा तुमच्याशीं विवाह झाला; विवाह होण्याचेवेळीं आपला करार असा होता कीं, आपण माझेजवळ राहून माझा व माझे मुलीचा उदरनिर्वाह करावा; त्याप्रमाणें आपण कांहीं दिवस वागले. परंतु आपण पुढें राहिनासे झाले असें दिसल्यावरून पंचानीं आपलेजवळून ता० २१-६-१९ इ० रोजीं करारनामा लिहून घेतला; त्यांतही असेंच लिहिलें आहे कीं, मी मरेपर्यंत आपण मला अन्नवस्त्र द्यावें कारण माझ्याच्यानें उद्योग होत नाहीं; व मी मेल्यावर आपणास वाटेल तिकडे जाण्याची मोकळीक आहे. या कराराप्रमाणें आपण दोन वर्षांपासून मुळींच वागत नाहीं. या करितां नोटीस मिळाल्यापासून आठ दिवसाचे आंत माझा व माझे मुलीचा खाण्यापिण्याचा खर्च रुपये २०० दोनशें घेऊन येऊन आमचे कर्ज फेडावें व पुढें आमचेजवळ रहावें. तसें न केल्यास हीच फारकती समजून माझ्या मुलीचा दुसऱ्या इसमाशीं विवाह करून देईन व दिवाणी दावा करून वर लिहलेली रक्कम खर्चासुद्धां भरून घेतले जाईल. कळावें.

सही

शेखहातम महमदनवाज राहणार पांतुर्डा ता० जळगांव जि० बुलडाणा पो० पातुर्डा

नो. नं. १३७

### जाहीर नोटीस.

या नोटिशीनें सर्वत्रास कळविण्यांत येते कीं, मी तारीख ९-४-१८ रोजीं नांदुरा येथें रा. सुदामा वा सदू वेंडर याजपासून अनुक्रम नं० १६९ चा पत्र छापाचा कागद रोखा लिहण्याकरितां विकत घेतला तो घेऊन (कोराच) मी माझे गांवीं मौजे खंडाळ ता० मलकापूर येथें जात असतां रस्त्यांत पडून गहाळ झाला सदरहू कागद कोरा कोणास सापडल्यास त्यांनीं तो खालील पत्त्यावर आणून द्यावा मी त्यांस त्याबद्दल ५ पांच रुपये बक्षीस देईन. सदरहू कागद कोणीही उपयोगांत आणूं नये. कोणी आणल्यास तो रद्द समजला जाईल कळावें ता. १९-४-१९१८

सहीची निशाणी आंगठा

सूर्यभान वा० परशराम जुनारे रा. खंडाळ ता. मलकापूर पो. नांदुरा.

नो. नं. १३८

### नोटीस.

नोटीस बेशमी (कबुलायत लिहून देणाराचें नांव) डेबुजी वा किसनजी कुणबी राहणार मौजे पो. आसरा ता. उमरावती जि. उमरावती यांसः—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मौजे दताळा प्र. व ता० मुर्तिजापूर जि० आकोला येथील शेत सर्व्हेनंबर ११६ हे शेत माझे मालकीचे आहे तें तुम्ही माझें पासून १३२७ सुरु ते सन १३३१ साल अखेर पावेतों पांच वर्षांकरितां कबुलायत बटाईनें निमे माल व भाडे बद्दल रुपये शंभर दरसाल द्यावे. किंवा वक्तशीर किस्तकारी न केल्यामुळें तुमचे निमेमालाची नुकसानी झालीतर या ऐवजीं रुपये साहाशे द्यावे याप्रमाणें दोन तीन इसमासमक्ष मुर्तिजापूर बाजारांत ता. १३-४-१७ ई रोजीं कबुल केलें वरून मी तुम्हाला कबुलायत लिहून व छापून आणण्याबद्दल परवानगी दिली. या वेळेस मला सवड नसल्यामुळें मी तुमचे बरोबर कबुलायत लिहिली व तेथें छापली त्या ठिकाणीं आली नाहीं. सदरहू कबुलायत आणून द्या म्हणून तुम्हाला बरेंच वेळां सांगितलें पण तुम्ही आणून दिली नाहीं म्हणून या कबुलायतीची ता. १६-४-१८ इ. रोजीं मी नक्कल काढली ते पाहतां त्यांत तुम्ही केलेला खोटेपणा नजरेस आला तो असा कीं. माझी गैरहजरीची वेळ साधून तुम्ही कबुलायतींत पिकाचें नुकसानीबद्दल ठरलेले रुपये साहाशाचे ऐवजीं रुपये तीनशें दर्शविले आहेत व या मुळेंच मला तुम्ही कबुलायत आणून दिली नाहीं व सन १३२७ सालचा शेताची किस्तकरी वक्तशीर केली नाहीं वरून १३२७ सालचें माझे मालकीबद्दलचा निमेमाल कडबा कुटार सुद्धां व भाडे बद्दल रुपये शंभर हे किंवा या ऐवजीं ठरावाप्रमाणें रुपये साहाशे यापैकीं कोणतेही म्हणजे रुपये किंवा माल हें तुम्ही अजूनपर्यंत मला आणून दिलें नाहीं. फक्त मी दताळा येथें आलों होतों तेवेळीं पीकाची अफरातफर होत आहे यामुळें वक्तशीर माझे समक्ष असलेला माल ज्वारी चार ४ खंडी [illegible]

[illegible]

एक इतका माल धरवा याप्रमाणें दताळा येथील मिरगाजी कुणबी याचे ताब्यांत देऊन मी गांवाकडे निघून आलों. दुसरा माल कपाशी वगैरे तुम्ही व तुमचा भाऊ भिवसन वा किसनाजी रा. दताळा दोघे एकत्र असल्यामुळें भिवसन यांनीं विक्री करून माझे शिपायासमक्ष दताळा येथील मारवाडी व भैराम वाघ या लोकांजवळ कपाशीची रक्कम बरवर ठेविली आहे. असें ऐकतों. तर या नोटिशीनें तुम्हाला कळविण्यात येते कीं, नोटीस पावल्यापासून अठ दिवसाचें आंत तुम्ही दोघे भाऊ माझेकडेस येऊन वरील कबुलीप्रमाणें निमे माल व रुपये शंभर ( भाडें बद्दल ) यांनून किंवा रुपये साहाशे मधून मिरगाजी कुणबी यांचेजवळ माझेमार्फत असलेलें ज्वारी चार खंडी सव्वाबारा कुडव मूग पायली एक याची किंमत बाजार भावानें वजा जातां हिशेब करून बाकीचा माल किंवा रक्कम वरील मुदतींत मला देऊन माझे सहीची पावती घ्यावी व ता. १३-४-१७ इ. रोजीचें कबुलायतींत तुमचा खोटेपणा आहे सबब मला ती कबुलायत मुळींच कबूल नाहीं सबब दुसरी कबुलायत ठरावाप्रमाणें लिहून व छापून आणून द्यावी याप्रमाणें नोटिशीचे मुदतींत तुमचेकडून न घडल्यास ही रक्कम माझे पदरांत पडेपर्यंत तुम्हाला या रकमेस दरमहा दरशेकडा दोन रुपये प्रमाणें व्याज द्यावें लागेल तसेंच याबद्दल तुमचेवर आम्हाला दावा करावा लागेल व मग या नोटिशीचा खर्च व पुढें लागणारे एकंदर खर्चाची जबाबदारी तुमचेवर आहे. यांत तोंडी तक्रार ऐकली जाणार नाहीं. ही नोटीस दिली. ता.

सही

शिवनराव तुरेराव दे० दे.
रा. मौजे जामठी बु द. ख.
पोष्ट माना.

नो. नं १३९


आकोला वऱ्हाडसमाचार छा. छ.

## जाहीर नोटीस.

नोटीस घेणार लक्ष्मी मर्द रावजी कुणबी राहणार बार्शीटाकळी इजला नोटीस देणार बापुना वा। रामजी कुणबी राहणार निहीद ता. आकोला मी अशी नोटीस देतों कीं, आपण टाकळी येथील शेत हे माझ्या वडिलोपार्जीत असलेले तुझी आह्मास देतं नाहीं कारण आपण आपले भाचे जवळ ठेविले आहेत. त्यानां आपण देण्याचा विचार दिसतो व आह्मी तुमचे सख्खे पुतणे आहो आमचा खरा हक आहे. आह्मी तिघे भाऊ असून आमची वडिलोपार्जित असलेली या इस्टेटीवर खरा हक आमचा आहे. व आमचे वडील मरण पावले तेव्हां आपण आह्मास सर्वा-समक्ष तुह्मी पंचासमक्ष कबूल केले व आतां ती इस्टेट सर्व बळकाऊ पाहात अहां खरा हक कोणाचा आहे हें सर्व पंचास ठाऊक आहे. व आह्मी त्या इस्टेटीचे वारस या हक्कानें आपणास नोटिसीनें जाहीर करीत आहो कीं, आपण आमचे शेताची व घरांतील सर्व भांडीं वगैरे याची व आंबराईतील एक चतुर्थांस हिसा असे सर्व जिनगीची अफरातफर करून आपण सर्व खराब करीत आहों. यासाठीं आह्मी या नोटिसीनें आपणांस कळवित आहों कीं, आपण नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आमचे तिन्ही भावाचे हिसे आमचे आह्मास वाटून द्यावे. नाहीं-तर अपाप्यावर कायद्याप्रमाणें योग्य कोर्टांत दावा करून सर्व जिनगी आह्मी सर्व जप्त करूं. तरी या नोटिसीनें आपणास कळ-विले आहे. व आपण कोणास विक्री अगर खरेदी द्याल तर तुमचेवर फौज-दारी करूं ही नोटीस दिली आज तारीख. १०-४-१८

सह्या

१ बापुना वा। रामजी नि. आंगठा

१ बीहू वा। रामजी नि. आंगठा

१ पांडू वा। रामजी नि. आंगठा

नो. नं. १४०

## नोटीस.

रा. रा. आकाराम वा। दावक पाटील राहणार मौजे चोहगांव प्रगणे बार्शीटाकळी पोष्ट महान ता. अकोला यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी आमची सावत्र आई आणि मी अशा दोघांम्याकडून २१ मार्च १९१८ रोजीं चार हजार ४००० रुपयांचे खरेदीखत सर्वेनंबर ८ पोटहिस्सा नं २ सर्वेनंबर ६ पेटाहिस्सा नं २ या दोन शेतांची खरीदी घेतली आहे. मला चार हजाराचा भरणा पोचलेला नाहीं. तुह्मी माझी सावत्र आई उमाई हिला आंतून मिळून घेऊन मला फस-विण्याचा उद्योग केला आहे. चार हजार रुपयांचा भरणा ही नोटीस पोंचताच आणून द्यावा. खरीदीखत रद्द आहे. आठ दिवसाचे आत तुह्मी योग्य ती तजवीज न कराल तर तुह्मावर कोर्टांत फिर्याद मांडून खरीदी रद्द करण्याची दाद व इतर नुकसानी या नोटीशीचे खर्चासुद्धां मिळ-विण्यांत येईल कळावे ता. २६-४-१८

सहीची निशानी

आंगठा पार्वती मर्द गोविंदा कुटे

रा. गिह ता. वाशीम पोष्ट

किन्हीराजा हिचा खुद.

नो. नं. १४१

आकोला वऱ्हाडसमाचार छा. का.